# सर्वोत्तम-५ (बेस्ट फाईव्ह) निकष

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०१० पासून सर्व सहा अनिवार्य विषयांसह प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांना सर्वोत्तम-५ (बेस्ट फाईव्ह) योजना लागू करण्यात आली आहे. त्यानुसार सर्व सहा अनिवार्य विषयासह प्रविष्ट होवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे सहा अनिवार्य विषयांचे विषयनिहाय गुण दर्शवून त्यापैकी ज्या पाच विषयांची टक्केवारी अधिक असेल त्या पाच विषयांचे एकूणात गुण (५०० पैकी) व टक्केवारी गुणपत्रिकेत दर्शविण्यात आलेले आहेत. या व्यतिरिक्त सर्व विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेत विषयनिहाय गुण, एकूण गुण व टक्केवारी या बाबी प्रचलित पध्दतीप्रमाणे दर्शविण्यात आलेल्या आहेत. मात्र उत्तीर्णतेचे निकष व अन्य सवलती प्रचलित पध्दतीप्रमाणे ठेवण्यात आलेल्या आहेत.